■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस

मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

• रिसोड जि.वाशीम • वर्ष १८ • अंक ३६ • मंगळवार, दि. २७ जानेवारी ते ३ फेब्रुवारी २०२६ • पृष्ठे ४ • किंमत १ रू.

### ■ भरघोस निधीसाठी पाठपुराव्याचे आश्वासन ■

# पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी केली टेम्पल गार्डनची पाहणी

**वाशिम, दि. २० जानेवारी (जिमाका) वाशिम शहरातील नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या टेम्पल गार्डनची पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी पाहणी करून प्रस्तावित विकासकामांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी उद्यानातील विविध सुविधांची माहिती घेत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली.**



यावेळी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, पोलीस अधीक्षक अनुज तारे, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण, भाप्रसे परिविक्षाधीन अधिकारी आकाश वर्मा, नगरपालिका सह आयुक्त डॉ. बाबुराव बिक्कड, मुख्याधिकारी निलेश गायकवाड, नगराध्यक्ष अनिल केंदळे, उपनगराध्यक्ष राजू भांदुर्गे तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

पाहणीदरम्यान उद्यानातील स्वच्छता, हिरवळ, चालण्याचे मार्ग, प्रकाशव्यवस्था तसेच नागरिकांसाठी आवश्यक असलेल्या इतर सोयी-सुविधांबाबत पालकमंत्र्यांनी सूचना दिल्या. टेम्पल गार्डन हे शहराच्या सौंदर्यात भर घालणारे आणि नागरिकांसाठी विरंगुळ्याचे महत्त्वाचे ठिकाण असल्याने येथे दर्जेदार व टिकाऊ विकासकामे होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी शासनामार्फत टेम्पल गार्डनच्या विकासासाठी भरघोस निधी उपलब्ध करून देण्यासाठी निश्चितपणे पाठपुरावा केला जाईल, असे स्पष्ट केले. तसेच जनतेच्या सेवेसाठी टेम्पल गार्डनचे दालन लवकरात लवकर खुले करण्यात यावे, असे निर्देश त्यांनी संबंधित यंत्रणांना दिले. नगरविकास विभागाकडे आवश्यक तो पाठपुरावा निश्चितच केला जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. या पाहणीमुळे टेम्पल गार्डनच्या विकासाला गती मिळून लवकरच नागरिकांना आधुनिक व सुसज्ज उद्यानाचा लाभ मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# घनकचरा विलिनीकरण प्रक्रिया केंद्राचे पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते उद्घाटन

**वाशिम, दि. २६ जानेवारी (जिमाका) शहर स्वच्छता, पर्यावरण संरक्षण व शाश्वत विकासाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत वाशिम येथे घनकचरा विलिनीकरण प्रक्रिया केंद्राचे उद्घाटन आज दि.(२६) रोजी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते करण्यात आले. 'फ्री ऑफ कॉस्ट ' तत्वावर चालविला जाणारा हा विलगीकरणाचा प्रथम प्रकल्प आहे.**





यावेळी नगरपालिका मुख्याधिकारी निलेश गायकवाड, नगरपालिका प्रशासनातील अधिकारी, लोकप्रतिनिधी, स्वच्छता कर्मचारी व नागरिक मोठ्या उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी पालकमंत्री ना. भरणे यांनी केंद्राची पाहणी करून कार्यपद्धतीची राम डोरले यांच्याकडून माहिती जाणून घेतली.

पालकमंत्री म्हणाले की, घनकचऱ्याचे योग्य प्रकारे वर्गीकरण, प्रक्रिया व पुनर्वापर केल्यास पर्यावरणावर होणारा दुष्परिणाम कमी करता येतो. हे केंद्र म्हणजे स्वच्छ भारत अभियानाला बळकटी देणारे महत्त्वाचे पाऊल असून, शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक शास्त्रशुद्ध पद्धतीने होणार आहे. या केंद्रामार्फत ओला व सुका कचरा वेगळा करून त्यावर प्रक्रिया करण्यात येणार असून सेंद्रिय कचऱ्यापासून खतनिर्मिती, तर पुनर्वापरयोग्य कचऱ्याचे वर्गीकरण करून त्याचा पुनर्वापर करण्यात येणार आहे.

त्यामुळे कचऱ्याचे प्रमाण कमी होऊन स्वच्छ व आरोग्यदायी वातावरण निर्माण होण्यास मदत होणार आहे.

जिजा ॲग्रिकल्चर प्रोड्यूसर कंपनी लिमिटेडचे संचालक राम डोरले यांनी केंद्राच्या उभारणीबाबत माहिती देताना सांगितले की, स्वच्छता व्यवस्थापनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला असून भविष्यात नागरिकांच्या सहकार्याने हे केंद्र आदर्श ठरेल.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नागरिकांनीही स्वच्छता राखण्याची व कचरा वेगळा करण्याची जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन करण्यात आले. घनकचरा विलगीकरण केंद्रातील काम करणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांशी पालकमंत्र्यांनी यावेळी संवाद साधला.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते राष्ट्रध्वज वंदन

### ■ जिल्हाधिकारी कार्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



वाशिम,दि.२६ जानेवारी (जिमाका) ७७ वा प्रजासत्ताक दिन जिल्हाधिकारी कार्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्याहस्ते ध्वजवंदन संपन्न झाले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, परिविक्षाधीन भाप्रसे अधिकारी आकाश वर्मा, उपजिल्हाधिकारी दीपक बाजड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी धनाजी तोरसकर, नगरपालिका प्रशासन सह आयुक्त डॉ बाबुराव बिक्कड, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरीफ शाहा,सहाय्यक जिल्हा सुचना व विधी अधिकारी नेमसींग तोमर, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी संजय राठोड , विधी अधिकारी महेश महामुने यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी उपस्थित माजी सैनिक, पत्रकार,अधिकारी व कर्मचारी यांची सदिच्छा भेट घेऊन शुभेच्छा दिल्या व परेड निरीक्षण केले. संचालन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत व नायब तहसीलदार अर्चना घोळवे यांनी केले.

# इस्त्रोचे हे यश आत्मनिर्भर भारतासाठी अत्यंत महत्त्वाचे

भारतीय अवकाश संशोधन संस्था 'इस्त्रो'ने ६ हजार १०० किलो वजनाच्या उपग्रहाचे अवकाशात यशस्वी प्रक्षेपण करून नवा इतिहास निर्माण केला आहे. इस्त्रोच्या 'बाहुबली' अग्निबाणाच्या सहाय्याने हे प्रक्षेपण बुधवारी सकाळी ८ वाजून ५५ मिनिटे ३० सेकंदांनी श्रीहरीकोटा येथील प्रक्षेपण केंद्रावरून करण्यात आले. या उपग्रहाचे नाव 'ब्ल्यूबर्ड ब्लॉक-२' असे आहे. इस्त्रोने आतापर्यंत प्रक्षेपित केलेल्या उपग्रहांमध्ये हा सर्वाधिक वजनाचा आहे. हा उपग्रह दूरसंचार सेवेसाठी असून तो निम्नकक्षेत परिभ्रमण करणारा सर्वांत वजनदार उपग्रह आहे. या उपग्रहाची निर्मिती अमेरिकास्थित 'एएसटी स्पेसमोबाईल' या खासगी कंपनीने केली आहे. इस्त्रोचे 'एलव्हीएम ३-एम-६' या अग्निबाणाने या उपग्रहाला पूर्वनिर्धारित कक्षेत सुस्थिर केले आहे. या अग्निबाणाच्या श्रेणीला 'बाहुबली' असे संबोधले जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या महत्त्वपूर्ण कामगिरीसाठी इस्त्रोचे अभिनंदन केले असून इस्त्रोचे हे यश आत्मनिर्भर भारतासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे असे आपल्या संदेशात म्हटले आहे. पूर्वनिर्धारित कार्यक्रमानुसार या उपग्रहाचे प्रक्षेपण बुधवारी सकाळी ८ वाजून ५४ मिनिटांनी केले जाणार होते. परंतु अवकाशातील परिस्थिती अनुकूल नसल्याने प्रक्षेपण ९० सेकंद विलंबाने करण्यात आले. अवकाशात उपग्रह प्रक्षेपणाच्या मार्गात 'अवकाश कचरा' आढळल्याने तो दूर होईपर्यंत प्रक्षेपण लांबविण्यात आले होते. इस्त्रोची व्यापारी शाखा 'न्यू स्पेस इंडिया लिमिटेड' आणि अमेरिकेची खासगी उपग्रह निर्मिती कंपनी 'एएसटी स्पेस मोबाईल' यांच्यात झालेल्या करारानुसार या उपग्रहाचे प्रक्षेपण करण्यात आले आहे. या उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण करून इस्त्रोने आपला पूर्वीचा विक्रम मोडीत काढला आहे. यापूर्वी इस्त्रोने ४ हजार ४०० किलो वजनाच्या उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण केले होते. या नव्या उपग्रहात अत्यंत आधुनिक अशी दूरसंचार साधने स्थापित करण्यात आली असून त्यामुळे मोबाईलवरून संपर्क साधण्यासाठी जमिनीवर मनोरे(टॉवर्स) असण्याची गरज नाही. मनोराविरहित संपर्क यामुळे शक्य होणार आहे. तसेच व्हीडीओ कॉल करण्यासाठीही हा उपग्रह उपयुक्त ठरणार आहे. या उपग्रहामुळे ४ जी आणि ५ जी ध्वनी आणि व्हीडीओ कॉल्स शक्य होणार आहेत. स्पेसमोबाईल या खासगी कंपनीने एक महत्त्वाकांक्षी योजना आखली असून या योजनेमुळे मनोराविरहित संपर्क शक्य होणार आहे. ही कंपनी 'आकाशाधारित' (स्पेस बेस्ड) सेल्युलर ब्रॉडबँड नेटवर्कची स्थापना करणार आहे. हे नेटवर्क व्यापारी आणि प्रशासकीय उपयोगासाठी असेल. तसेच ते ४ जी आणि ५ जी कॉल्स, संदेशवहन, स्ट्रीमिंग आणि विदासेवा (डाटा सर्व्हिस) यांच्यासाठी उपयुक्त असेल. भारताच्या अवकाश क्षेत्रातील कामगिरीतले हे भरीव यश आहे. भारताच्या अवकाश प्रवासातील हा देदीप्यमान क्षण आहे. या उपग्रहामुळे अवकाशातून सामान्य स्मार्टफोनवर थेट हाय-स्पीड इंटरनेट प्रवेश मिळेल. ब्ल्यूबर्ड ब्लॉक-२ हा एएसटी स्पेसमोबाईलच्या पुढील पिढीतील संप्रेषण उपग्रह मालिकेचा एक भाग आहे.

# संत तुकाराम विद्यालयात ए.आ .विषयावर कार्यशाळा




रिसोड: महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन लिमिटेड (श्रख्ण) अंतर्गत अमोल इन्फोटेक कम्प्युटर, रिसोड यांच्या वतीने आज दिनांक २० जानेवारी रोजी संत तुकाराम महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय कंकरवाडी येथे कृत्रिम बुद्धिमत्ता (र्गिर्मित घ्लूत्त्गुहम "घ) या विषयावर आधारित मार्गदर्शनात्मक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सोळंके यांनी विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेची सविस्तर माहिती देत तिचे शैक्षणिक व दैनंदिन जीवनातील उपयोग तसेच भविष्यातील करिअरच्या संधी याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. त्याचबरोबर वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांना येणाऱ्या बोर्ड परीक्षेच्या अनुषंगाने अभ्यास नियोजन, वेळेचे व्यवस्थापन व यशासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.

जाधव तसेच शाळेतील वर्ग शिक्षक मदन खानझोडे व इतर शिक्षक व शिक्षिका वृंद यांची उपस्थिती लाभली.

कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी सर्वांचे मोलाचे सहकार्य मिळाले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानासह परीक्षेच्या तयारीसाठी योग्य दिशा मिळाल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या वेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर

# बँक ऑफ इंडिया शाखा रिसोड कडून प्रधान मंत्री जीवन सुरक्षा विमा




**रिसोड :** बँकऑफइंडिया शाखा रिसोड कडून प्रधान मंत्री जीवन सुरक्षा विमा योजना व प्रधान मंत्री जीवन ज्योती विमा योजने अंतर्गत आज बिबखेडा येथील गौतम जुमडे पळसखेडा येथील विनोद खानझोडे यांचा आपघाती मृत्यू झाल्याने व धोडप बु. येथील अरुणोदय बोडखे यांचा नैसर्गिक मृत्यू झाल्याने त्याच्या परिवारास बँक ऑफ इंडिया शाखा रिसोड यांच्या वतीने बिबखेडा येथील शीला गौतम जुमडे पळसखेडा येथील गीता विनोद खानझोडे व धोडप बु येथील कल्पना अरुणोदय बोडखे यांना प्रत्येकी रुपये दोन लाख रुपयांची आर्थिक मदत बँक ऑफ इंडिया शाखा रिसोड यांच्या वतीने बँक मॅनेजर संतोष कालापाड बँक अधिकारी अनंत ठाकरे साहेब बँक अधिकारी गजानन बोरकर बँक अधिकारी श्री ऋषिकेश फुके साहेब वैभव आंबेकर साहेब रामेश्वर बाजड गौरव चीम साहेब सुनिल देशमुख बँक कर्मचारी व बँक मित्र श्री सुनिल बोडखे यांच्या उपस्थितीत दोन लाख रुपयांचा चेक यांच्या वारसास देण्यात आला. कार्यक्रमाची प्रस्तावना सुनील बोडखे यांनी केली तर आभार प्रदर्शन बँकेच्या वतीने अनंत ठाकरे यांनी केले. श.प्र.






**पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक ) । R.N.I. No. MAHMAR/2008/24720**

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)



## जनगणनेबाबत ओबीसी समाजात संभ्रम

# जनगणनेच्या सूचित ओबीसीचा उल्लेख नाही!

**गडचिरोली** : अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती सोबतचओबीसींची जात निहाय जनगणना करण्याचे केंद्र सरकारने जाहीर केले होते. नुकतेच २२ जानेवारी २०२५ रोजी केंद्र शासनाच्या वतीने राजपत्र जारी करण्यात आले आहे. जनगणने संबंधी ३३ सूची जाहीर करण्यात आल्या असून १२ व्या क्रमांकावर अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचा उल्लेख आहे. मात्र ओबीसीचा उल्लेख नाही. यामुळेओबीसी समाजात जातनिहाय जनगणना होईलकी नाही असा संभ्रम निर्माण झाला असून ओबीसी समाजात शासनाच्या विरोधात संतापाची लाट उसळली आहे.

देशभरात जातीय जनगणना केली जावी अशी राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या तसेच इतर समविचारी ओबीसी संघटनांच्या वतीने मागणी केली होती. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या ३० मे २०२५ रोजी झालेल्या बैठकीत देशात जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेण्यात आला. केंद्रीय रेल्वे तथा माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर ही माहिती देशाला दिली होती. आक्टोबर २०२६ पासून जम्मू-काश्मीर हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये तर उर्वरित भागात मार्च २०२७ पासून जनगणना सुरू करण्यात येणार असल्याचे १६ जून २०२५ रोजी स्पष्ट करण्यात आले होते. ७ जानेवारी २०२६ रोजी जनगणने संदर्भात राजपत्र जारी केले गेले आणि नुकतेच २२ जानेवारी २०२६ रोजी जनगणना करण्यासाठी ३३ सूची तयार करून राजपत्रात समाविष्ट करण्यात आल्या.

### अन्यथा देशभर आंदोलन छेडण्याचा इशारा

१२ व्या क्रमांकावर अनुसूचित जाती आणि जमातीचा उल्लेख करण्यात आला, इतरांसाठी अन्य शब्दांचा प्रयोग करताना ओबीसींचा स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे आता तरी ओबीसींची जनगणना होईल की नाही असा संभ्रमओबीसी समाजात निर्माण झालेला आहे. यासंदर्भात केंद्र व राज्य सरकारने तात्काळ स्पष्टीकरण द्यावे अन्यथा यासंदर्भात देशभर आंदोलन छेडण्याचा इशारा राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष शेषराव येलेकर, गडचिरोली जिल्हाध्यक्ष दादाजी चूधरी, कार्याध्यक्ष रामकृष्ण ताजने, उपाध्यक्ष पांडुरंग घोटेकर, प्रा. देवानंद कामडी, सचिव सुरेश भांडेकर, कोषाध्यक्ष डॉ. सुरेश लडके, संघटक चंद्रकांत शिवणकर, युवा अध्यक्ष राहुल भांडेकर, महिला अध्यक्ष मंगला कारेकर आदींनी शासनाला दिला आहे.

# देशाच्या विकासात महिलांचा सहभाग वाढला

## राष्ट्रपती मुर्मू यांचे प्रतिपादन

**नवी दिल्ली**: ७७व्या प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशाला संबोधित केले. यावेळी त्यांनी प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देताना सांगितले की, हा उत्सव देशवासियांमध्ये राष्ट्रीय एकता आणि अभिमानाची भावना दृढ करतो. त्या म्हणाल्या की, देशाच्या विकासात महिलांचा सहभाग वाढला आहे. ५७ कोटी जन-धन खात्यांपैकी ५६ टक्के खाती महिलांची आहेत. १० कोटींहून अधिक स्वयं-सहायता गट आहेत. खेळामध्ये आपल्या मुलींनी विक्रम केले आहेत. महिला क्रिकेट संघाने आयसीसी क्रिकेट विश्वचषक, ब्लाइंड विश्वचषक जिंकला आहे. नारी शक्ती कायद्यामुळे देशातील महिला आणखी सशक्त होतील.

राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या की, यावर्षी प्रजासत्ताक दिनासोबतच वंदे मातरम् ला १५० वर्षे पूर्ण झाल्याचा उत्सवही साजरा केला जात आहे. प्रजासत्ताक दिनाचा हा पवित्र दिवस आपल्याला देशाच्या भूतकाळावर, वर्तमानावर आणि भविष्यावर विचार करण्याची आणि समजून घेण्याची संधी देतो. काळानुसार आपल्या देशाची स्थिती बदलली आहे. भारत स्वतंत्र झाला आणि आपण स्वतः आपल्या देशाचे भविष्य ठरवणारे बनलो.



» वंचित वर्गाच्या योजनांना सातत्याने प्रोत्साहन दिले जात आहे. महिलांचे सक्रिय आणि सक्षम असणे देशाच्या विकासासाठी आवश्यक आहे. त्यांच्या आरोग्य, शिक्षण, सुरक्षा आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी केल्या जात असलेल्या राष्ट्रीय प्रयत्नांमुळे अनेक क्षेत्रांमध्ये महिलांचा सहभाग वाढला आहे.

» ऑपरेशन सिंदूरवर- गेल्या वर्षी आपल्या देशाने ऑपरेशन सिंदूरद्वारे दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर अचूक हल्ला केला. दहशतवादाचे अनेक अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले. अनेक दहशतवाद्यांना त्यांच्या अंतापर्यंत पोहोचवण्यात आले. भूदल, वायुदल आणि नौदलाच्या शक्तीच्या आधारावर आपल्या सुरक्षा-क्षमतेवर देशवासीयांचा पूर्ण विश्वास आहे.

# नव्या करप्रणालीत होणार मोठे फेरबदल!




**नवी दिल्ली**: अर्थमंत्री निर्मला सीतारामन १ फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थसंकल्प सादर करणार आहेत आणि प्रत्येक वर्षाप्रमाणेच यंदाही मध्यमवर्ग आणि नोकरदार लोक बजेटमधील घोषणांकडे लक्ष ठेवून असतील. प्रत्येक वर्षी सामान्य माणसाला अर्थसंकल्पातून कर सवलतीची अपेक्षा असते, विशेषतः, मानक वजावटीत वाढ होण्याची अपेक्षा यंदाही जास्त आहे. मानक वजावट ही एक साधी वजावट आहे जी तुमच्या एकूण उत्पन्नातून थेट वजा केली जाते. ही एक निश्चित रक्कम आहे जी पगारदार व्यक्ती आणि पेन्शनधारकांना दरवर्षी कर भार कमी करण्यास मदत करते.

मानक वजावटीची मर्यादा वाढवणे पगारदार वर्गासाठी सर्वात मोठी आशा असते. त्यामुळे, सरकार मानक वजावटीची मर्यादा १ लाखांवरून १.२५ लाख करू शकते असे मानले जात आहे. असे झाल्यास मध्यमवर्गाला मोठा दिलासा मिळू शकेल. वाढती महागाई आणि शहरांमधील राहणीमानाचा खर्च लक्षात घेता, या निर्णयामुळे करदात्यांना खर्च करण्यासाठी खिशात अधिक पैसा शिल्लक राहील.

इकॉनॉमिक टाइम्सच्या अहवालानुसार ओसान कन्सल्टंट्स प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक मानस चुघ म्हणतात की २०२६ च्या अर्थसंकल्पात वैयक्तिक वित्तपुरवठ्याशी संबंधित काही महत्त्वाचे बदल केले जावे, त्यापैकी मानक वजावट ही महत्त्वाची आहे. नवीन कर प्रणालीत मानक वजावट ७५,००० रुपयांवरून एक लाखपर्यंत वाढवण्याबाबत त्यांनी सांगितले. त्याचवेळी, मध्यमवर्गीय, विशेषतः ज्यांचे उत्पन्न १२ लाख ते २०० लाख दरम्यान आहे, अधिक सोप्या आणि तर्कसंगत कर स्लॅबसाठी आग्रही आहेत. सध्या, १६-२० लाख दरम्यानच्या उत्पन्नावर २०टक्के कर आकारला जातो, ज्यामुळे उच्च-मध्यम वर्गाचे राहणीमान सुधारू शकते.



# आदीसेतु जनसंवाद उपक्रमातील प्रश्नांवर जिल्हाधिकाऱ्यांचा ठोस अजेंडा

## रस्ते, पाणी, रोहयो, वस्तीगृह, अन्नधान्य व नेटवर्क प्रश्नांवर स्पष्ट निर्देश

वाशिम: आदीसेतू जनसंवाद उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्ह्यातील प्रत्येक समस्या वेळेत मार्गी लागली पाहिजे, यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने आणि तात्काळ कार्यवाही करावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील राजेवाकाटक सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीत श्री कुंभेजकर बोलत होते. त्यांनी यावेळी विविध गावांतील नागरिकांनी मांडलेल्या समस्या, त्यावर झालेली व होणारी कार्यवाही याबाबत सविस्तर सूचना दिल्या.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, महसूल उपजिल्हाधिकारी विरेंद्र जाधव, उपजिल्हाधिकारी दीपक बाजड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी कालीदास तापी, कृषी उपसंचालक हिना शेख, उपशिक्षणाधिकारी गजानन डाबेराव, महिला व बालकल्याण कार्यक्रम अधिकारी संजय जोल्हे आदींची प्रमुख उपस्थिती होती. १७ डिसेंबर २०२५ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती येथील अधिकाऱ्यांनी वाशिम जिल्ह्यातील विविध गावांना दिलेल्या क्षेत्रभेटीदरम्यान नागरिकांकडून रस्ते, पाणीपुरवठा, रोजगार, आरोग्य, शिक्षण, अन्नधान्य व मूलभूत सुविधांबाबत अनेक मागण्या मांडण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत शेअर करण्यात आलेल्या गुगल शीटमध्ये संबंधित विभागांनी आपल्या स्तरावर केलेल्या अनुपालनाची सविस्तर माहितीतातडीने अद्यावत करावी, असेही निर्देश देण्यात आलेजिल्ह्यात स्थलांतरित होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हंगामी वस्तीगृह सुरू करण्याच्या दृष्टीने ज्या ठिकाणी आवश्यकता आहे, त्या ठिकाणी प्रत्यक्ष तपासणी करून नियमानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. एकांबा गावामध्ये पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियमित भेटी, खडी-मोहरी मार्गावरील उखडलेला रस्ता पक्का करण्यासाठी प्रत्यक्ष पाहणी, तसेच स्मशानभूमी बांधकाम व रस्त्यालगत नाल्यांच्या अभावाबाबत ग्रामपंचायतीसोबत नियोजन करण्याचे आदेश देण्यात आले. रोहयो अंतर्गत संबंधित गावांमध्ये किती कामे पूर्ण झाली आहेत, किती सुरू आहेत आणि जॉब कार्डवर किती लाभार्थी कार्यरत आहेत, याची स्थलांतर कालावधीतील महिना-निहाय माहिती संकलित करण्यावर भर देण्यात आला. संयुक्त खात्यांबाबत व खातेफोडीच्या प्रश्नाची इतर गावांमध्येही तपासणी करून तहसीलदारांच्या माध्यमातून कॅम्प आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले.

### यंत्रणा प्रमुखांना जबाबदारीने काम कर ण्याचे आवाहन

अंगणवाड्यांमध्ये मुदतबाह्य मालाचा पुरवठा होत नाही, याची खात्री करून घेण्यासह ज्या विभागांची माहिती अद्याप गुगल शीटवर भरलेली नाही, त्यांनी ती तातडीने भरावी, असे निर्देश देत जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी उपस्थित यंत्रणा प्रमुखांना जबाबदारीने काम करण्याचे आवाहन केले. बैठकीला अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेच्या गुण पडताळणीसाठी २१ जानेवारीपर्यंत आक्षेप नोंदविता येतील

मुंबई दि. १९ : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) २०२५ चा अंतरिम निकाल नुकताच जाहीर करण्यात आला आहे. निकालाच्या अनुषंगाने गुण पडताळणी करावयाची असल्यास अथवा त्रुटी / आक्षेप असल्यास http://mahatet.in या संकेतस्थळावर २१ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी सहा वाजेपर्यंत उमेदवार/ परीक्षार्थींना लॉगिन करुन ऑनलाईन पद्धतीने आक्षेप नोंदविता येईल, असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी कळविले आहे. अन्य मार्गाने आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची संबंधित सर्व उमेदवार परीक्षार्थींनी नोंद घ्यावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# सनराईज इंग्लिश स्कुलमध्ये घनकचरा व्यवस्थापनावर जनजागृती





**रिसोड** : सनराईज इंग्लिश स्कूलमध्ये आज दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी २.०' अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन व स्वच्छतेचे महत्त्व या विषयावर विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी नगरपरिषदेच्या वतीने ट्रेनर म्हणून सौ. स्नेहा वाढवे मॅडम उपस्थित होत्या, तसेच सनराइज इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या रोज मेरी जोस

यांबरोबर या उपक्रमासाठी नोडल पर्सन म्हणून श्री. गिरीश राऊत हे सनराईज इंग्लिश स्कूल, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्या सौ. रोज मेरी जोस मॅडम यांनी उपस्थित मान्यवर पाहुण्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन मनःपूर्वक स्वागत केले. त्यानंतर शिक्षक श्रीहरी पवार यांनी प्रास्ताविक करत स्वच्छतेचे महत्त्व, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन आणि त्याचा दैनंदिन जीवनावर होणारा परिणाम याविषयी विद्यार्थ्यांना थोडक्यात मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात ट्रेनर सौ. स्नेहा वाढवे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना अतिशय दर्जेदार, उपयुक्त व प्रभावी माहिती दिली. त्यांनी घनकचरा व्यवस्थापनाचे महत्व स्पष्ट करताना विविध ?क्टिव्हिटीज, व्हिज्युअल एड्स, स्टोरी टेलिंग, गाणी, खेळ तसेच फ्लॅश/प्लेकार्ड्स यांचा प्रभावी वापर केला. या ?क्टिव्हिटीजनंतर त्यांनी सहभागी विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी वस्तू भेट स्वरूपात देऊन विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवला तसेच त्यांना पुढील उपक्रमांसाठी प्रेरित केले. कचरा व्यवस्थापनाचा आपल्या जीवनाशी व समाजाशी असलेला निकटचा संबंध त्यांनी सोप्या व समजण्याजोग्या पद्धतीने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवला. यावेळी प्राचार्या सौ. रोज मेरी जोस मॅडम यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना स्वच्छतेचा संदेश देताना, 'स्वच्छता ही केवळ सवय नसून ती आपली सामाजिक जबाबदारी आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वच्छतेची सुरुवात स्वतःपासून करावी,' असे प्रतिपादन केले.

कार्यक्रम अत्यंत उत्साही व सहभागात्मक वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला व स्वच्छता तसेच कचरा व्यवस्थापनाबाबत सकारात्मक दृष्टीकोन विकसित केला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रस्तावना तसेच आभार प्रदर्शन शिक्षक श्रीहरी पवार यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी नोडल पर्सन गिरीश राऊत, शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले. अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण होऊन स्वच्छ व आरोग्यदायी समाज घडवण्यास निश्चितच मदत होईल, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. ता.प्र.

# आत्महत्या हा पर्याय नाही, आयुष्य अमूल्य आहे

## तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांचे प्रतिपादन



**रिसोड** : तालुक्यात घडत असलेल्या आत्महत्यांच्या घटनांनी संपूर्ण समाज अस्वस्थ झाला असून, या दुर्दैवी घटनांना आळा घालण्यासाठी प्रत्येकाने जबाबदारीने पुढे येणे अत्यावश्यक असल्याचे भावनिक प्रतिपादन तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी केले. 'कुठलीही अडचण कायमची नसते, मात्र आत्महत्या केल्यास संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त होते. त्यामुळे कृपया आत्महत्या करू नका, संवाद साधा, मदत घ्या' अशी अत्यंत कळकळीची विनंती त्यांनी मसला पेन येथे समुपदेशन करताना केली.

रिसोड तालुक्यातील मसला पेन येथे आत्महत्याग्रस्त कुटुंबाला भेट देऊन त्यांनी कुटुंबीयांचे सांत्वन केले व त्यांच्या दुःखात सहभागी होत मानसिक आधार दिला. यावेळी शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देत संबंधित कुटुंबाला महाराष्ट्र शासनाच्या संजय गांधी विधवा योजनेचा लाभ देण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले.

यावेळी बोलताना प्रमाण रोखण्यासाठी केवळ शासनावर अवलंबून राहून चालणार नाही. सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्था, महिला मंडळे, युवक संघटना, शाळा-महाविद्यालये आणि गावातील जबाबदार नागरिक यांनी पुढाकार घेऊन जनजागृती, समुपदेशन व मानसिक आरोग्य विषयक शिबिरे आयोजित करणे ही काळाची गरज आहे. 'प्रत्येक गावात संवाद वाढवणे, अडचणीत सापडलेल्या व्यक्तीला एकटं वाटू न देणे, वेळेत मदतीचा हात पुढे करणे यामुळे अनेक आयुष्ये वाचू शकतात, असेही त्यांनी भावनिक शब्दांत सांगितले. 'एक जीव वाचवणे म्हणजे संपूर्ण कुटुंबाला वाचवणे होय,' असे त्या म्हणाल्या.

या दौऱ्यादरम्यान तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी अंगणवाडी व जिल्हा परिषद शाळेला भेट देऊन तेथील कामकाजाचा आढावा घेतला. कार्यक्रमास मंडळ अधिकारी लोखंडे ग्राम महसूल अधिकारी बाविस्कर व ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच गावकरी मोठ्या संख्येने

# महाराष्ट्र क्रिकेट संघटनेवर प्रशासकपदी सेवानिवृत्त न्यायमुर्ती जि.ए.सानप

**रिसोड** : जिल्ह्यातील भर जहागीर येथिल परंतु मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमुर्ती जि. ए. सानप यांची महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या प्रशासक पदी धर्मादाय आयुक्तांनी प्रशासक म्हणून निवड केली आहे. ही बाब वाशीम जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणारी भुषणावह आहे. सेवानिवृत्त न्यायमुर्ती जि. ए. सानप यांच्या माध्यमातून महाराष्ट्रासह नक्कीच जिल्ह्यातील क्रिकेट ला नवसंजिवणी प्राप्त होण्याची संधी प्राप्त झालेली आहे.

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या निवडीला मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्यानंतर धर्मादाय आयुक्तांनी मुंबई उच्च न्यायालयाचे सेवा न्यायमुर्ती गोविंदराव



आनंदराव सानप यांची एमसीए प्रशासक पदी कार्य न्यायीक प्रक्रियेच्या माध्यमातून सुरळीत चालविण्याची जबाबदारी मिळाली आहे.

सेवानिवृत्त न्यायमुर्ती गोविंदराव आनंदराव सानप यांची मुंबई उच्च न्यायालय नागपुर खंडपीठावर न्यायमुर्ती पदी आसतांनी वाशीम जिल्हाचे पालक न्यायमुर्ती म्हणुन जबाबदारी आली आसतांनी त्यांच्या माध्यमातून जिल्ह्यातील रिसोड - कारंजा येथिल जिल्हा व सत्र न्यायालयाच्या भव्य इमारती साठी मोलाचे सहकार्य लाभलेले आहे. रिसोड येथिल जिल्हा व सत्र न्यायालयाला मंजुरात प्राप्ती नंतर सुमारे सात एकर जागा मंजुर करण्यात मोलाचे सहकार्य लाभलेले आहे. त्याच प्रमाणे जागतिक का-या पाण्याचे लोणार सरोवरांचा कोट्यावधीचा विकास आराखडा निर्माणा साठी कोट्यावदमधीचा निधी उपलब्धते साठी सिंहाचा वाटा लाभलेला आहे. न्यायमुर्ती सानप यांना शालेय जिवनापासुन क्रिकेट खेळाचा छंद होता.

या संदर्भात आजही त्यांच्या भर जहागीर या मुळ गावी अनेक किस्से अधोरेखीत आहेत. त्यांच्या निवडीने

सेवानिवृत्त न्यायमुर्ती गोविंदराव आनंदराव सानप (महाराष्ट्र क्रिकेट संघटना प्रशासक मुंबई) न्यायालयीन प्रक्रिये मध्ये न्यायदानाचे कार्य करतांनी अनेक जबाबदा-या माझ्या माध्यमातून योग्यरित्या न्यायदानाचे कार्य केलेले आहे. क्रिकेट हा खेळ प्रारंभी पासुनच आवडीचा आहे. आणि एमसीए क्रिकेट ची जबाबदारी मिळाली आहे. निश्चित क्रिकेट च्या सर्वांगीण विकासाला योग्य चालना देण्याची जबाबदारी पार पाडणार आहे.

निश्चितच महाराष्ट्रातील क्रिकेटसह वाशीम जिल्ह्यातील क्रिकेट ला नवसंजिवणी प्राप्त होण्यास एक नवीन संधी उपलब्ध झाल्याने भर जहागीर सह रिसोड तालुक्यामध्ये आनंदत्सोव साजरा होत आहे. श.प्र.

# राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष खडसे यांनी घेतली शरद पवार यांची भेट

**रिसोड** : जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (शरद पवार गट) चे अध्यक्ष बाबाराव खडसे पाटील यांनी नुकतीच पक्षाचे सर्वोच्च नेते शरदचंद्र पवार यांची मुंबई येथे त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली .

यावेळी त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या जिल्ह्यातील पक्ष करीत असलेल्या कार्याची माहिती दिली शरद पवार यांचे जिल्ह्यातील एकनिष्ठ व विश्वासू म्हणून बाबाराव खडसे यांच्याकडे पाहिले जाते सध्याचे राजकारणाची स्थिती पाहता कोण कोणत्या पक्षाकडे आहे किंवा जाईल याची कुठली शाश्वती राहिलेली नाही त्यासोबतच कोण कोणाशी युती करेल याचीही शाश्वती राहिली नाही अनेक जण पक्षाचे स्वार्थासाठी पक्षात येतात स्वार्थ संपला की पक्ष सोडून जातात असे जिल्ह्याचे राजकारणात अनेक उदाहरणे देता येतील मात्र शरद पवार यांनी स्थापन केलेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या स्थापनेपासून बाबाराव खडसे पाटील हे त्यांचे विश्वासू सहकारी म्हणून आजही जिल्ह्यात कार्यरत आहेत त्यांच्या शरद पवार यांच्या प्रति असलेली निष्ठा व विश्वास त्यांनी सार्थ ठरवला असून आजही पक्षाची वाशिम जिल्ह्याची धुरा ते सांभाळत आहेत आणि हीच निष्ठा व विश्वास यामुळे आजही



ते शरद पवार असो की जयंत पाटील असो यांचे अतिशय विश्वासू सहकारी म्हणून जिल्ह्यात ते कार्यरत आहेत मुंबई भेटीत त्यांनी शरद पवार यांचे सोबतच पक्षाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष जयंत पाटील यांची सुद्धा भेट घेऊन जिल्ह्याच्या राजकारणाबाबत सविस्तर चर्चा केली माननीय शरदचंद्रजी पवार तसेच पक्षाध्यक्ष जयंत पाटील यांचे नेतृत्वाखाली आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकांमध्ये सुद्धा आपण राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरद चंद्र पवार) गटाला चांगले यश मिळवण्यासाठी निश्चित प्रयत्न करू असे त्यांनी सांगितले. वि.प्र.